# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

## वैद्यकीय कर्ज नियमावली

### (दि.१५/१२/२०२२ पासुन लागू)

१. सदर नियमांस **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** या बँकेचे **'वैद्यकीय कर्ज'** असे नांव राहील.

२. बँकेचा नियमित सभासद वैद्यकीय कर्जास पात्र राहील.

३. अर्जदार सभासद नियमित खातेदार असावा, तसेच तो थकीत कर्जास जामीनदार नसावा.

४. सदर कर्जास दोन सक्षम जामीनदार दयावे लागेल.

५. सभासद स्वत: किंवा त्यांचे कुटूंबातील व्यक्ती (पती, पत्नी किंवा २५ वर्षे वयाखालील मुले) यांच्या वैद्यकीय उपचारासाठी औषधासह येणाऱ्या खर्चासाठी सदरचे कर्ज मंजुर केले जाईल. सदरचे कर्ज कोणत्याही आजारासाठी दिले जाईल मात्र संबंधीत आजारी व्यक्ती दवाखाण्यात ॲडमीट असणे आवश्यक आहे.

६. सदरचे कर्ज सभासदांच्या मुलांसाठी किंवा पती / पत्नीच्या औषधोपचारासाठी देण्यात येत असते तरी हे कर्ज सभासदाच्या नावावरच देण्यात येईल.

७. उपचारासाठीचा होणारा खर्च अथवा कमाल रु. १.५० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्या रकमेपावेतो वैद्यकीय कर्ज मंजुर केले जाईल. सदरची रक्कम हॉस्पीटल / मेडीकल यांच्या नावाने चेक / NEFT व्दारे अदा करण्यात येईल ती कोणत्याही परिस्थितीत रोख स्वरुपात किंवा खात्यावर जमा केली जाणार नाही.

८. सदरच्या कर्जाची किमान कर्ज मर्यादा रु.२०,०००/- इतकी आहे. रु.२०,०००/- चे आतील वैद्यकीय उपचारासाठी हे कर्ज दिले जाणार नाही.

९. सदर कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ११% इतका राहील. खाते थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर २% इतक्या दराने दंड व्याज आकारण्यात येईल. सदरचे व्याज मासिक पध्दतीने खात्यावर नावे टाकले जाईल.

१०. वैद्यकीय कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुण्यातील अर्ज, हॉस्पिटलचे अपेक्षित खर्चाबाबतचे प्रमाणपत्र, आजाराचे निदान झाल्याबाबतचे पत्र इत्यादी सर्व कागदपत्राची पुर्तता करुन बँकेकडे सादर करावे लागेल नंतरच अंतिम मंजुरी दिली जाईल. सदर कर्जासाठी नियमाप्रमाणे ५% शेअर्स व १०% कायम वर्गणी ठेव असणे आवश्यक राहील.

११. सदर कर्जाची मुदत १२ महिने इतकी राहील. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदरचे खाते थकीत समजले जाईल. सभासदास सदर कर्ज खात्यावर केव्हाही किंवा मासिक स्वरुपात रक्कम जमा करता येईल.

१२. वैद्यकीय कर्ज मंजुर / नामंजुर करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे मात्र कर्ज नामंजुरी बाबतचे कारण सभासदास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

१३. वरील नियमात फेरफार अथवा बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाला राहील.

**संचालक मंडळ सभा दि.११/१२/२०२२ विषय क्र. १२ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.१५/१२/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| (सुरेश पाटील) | (मंदाकिनी पवार) | (सुधीर पगार) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्षा | अध्यक्ष |